धक्का!! सुराज्य सोलापूर

मंगळवार, दि. ९ एप्रिल २०२४ । पान १२

# भाजप, शिंदेसेना नेतेमंडळींना भिडले मराठे

# प्रचार शुभारंभ उधळला



# राम सातपुतेंनी पळ काढला


**मोहोळ : वडवळ (ता. मोहोळ ) इथं आज सोमवारी सकल मराठा बांधव प्रचंड आक्रमक झालेले दिसले. 'चलेजाव चलेजाव तुम सब चले जाव' अशी प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली. भाजप आणि एकनाथ शिंदे शिवसेना गटाचे पदाधिकारी यांना जाब विचारण्यात आला. यावेळी वातावरण अधिक आक्रमक झालं. यादरम्यान लोकसभेचे महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांचा इथला दौरा आणि प्रचाराचा शुभारंभ रद् करण्याची नामुष्की भाजप आणि एकनाथ शिंदे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांवरुन ओढावली. मराठ्यांचा अनावर झालेला संताप पाहून आमदार राम सातपुते यांना येथे न थांबता निघून जाणे पसंद केले.**



वडवळ (ता. मोहोळ) येथे महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांचा प्रचार शुभारंभ उधळण्यासाठी जमलेले सकल मराठा बांधव.

दरम्यान, सातपुते यांच्या प्रचाराचा शुभारंभ वडवळऐवजी कोळेगाव येथे करण्यात आला. याप्रसंगी वडवळ इथं सकल मराठा समाजाच्यावतीने आमदार राम सातपुते यांच्या भूमिकेचा निषेध करण्यात आला. आमदार राम सातपुते हे आपल्या प्रचाराच्या शुभारंभासाठी वडवळ इथल्या श्री नागनाथ देवस्थान इथं येणार असल्याचे कळताच मराठ्यांनी सकाळपासूनच गर्दी केली होती.सातपुते हे पोचण्यापूर्वी जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम समितीचे सभापती विजयराज डोंगरे यांच्यासह काही पदाधिकारी पोचले होता. या संबंधितांना मराठ्यांनी जाब विचारायला सुरुवात केली.

याचदरम्यान मराठे अधिक आक्रमक झाले. त्यांनी 'एक मराठा लाख मराठा, आरक्षण आमच्या हक्काच नाही कुणाच्या बापाचं, कोण म्हणतय देत नाही घेतल्या शिवाय रहात नाही, चलेजाव चलेजाव तुम सब चले जाव' अशी घोषणाबाजी सुरु केली. मराठ्यांचा हा संताप आणि काहीही ऐकून न घेण्याची मनस्थिती पाहून विजयराज डोंगरे यांच्यासह भाजप आणि एकनाथ शिंदे शिवसेना गटाचे पदाधिकारी यांनी तेथून निघून जाणे पसंद केले.



## 'या' होत्या मराठ्यांच्या भावना

राम सातपुते हे आमदार आहेत त्यांनी मराठा समाजाच्या भावनांचा अनादर केला आहे. त्यांनी समाजाच्या भावना जाणून घ्यायला हव्या होत्या. केंद्रात अन राज्यात भाजपाचे सरकार आहे, सत्ता आहे तरीही आंतरावली सराटी येथे आया-बहिंणीवर लाठीचार्ज करण्यात आला. आंदोलनात जरांगे -पाटलाची फसवणूक केली. सगेसोयरे शब्द पाळला नाही याबाबत आम्ही समाजाच्यावतीने जाब विचारणार होतो. त्यांनी भावना समजून घेणे आवश्यक होते. आमच्या प्रश्नांना उत्तरे देणे आवश्यक होते. परंतु ते इथं आले नाहीत असं आदोलकांनी सांगितलं.

## तौल-मौल के बौल...



**शरद पवार गेल्या ६० हून अधिक वर्षांपासून राजकारणात सक्रिय आहेत. त्यांच्या राजकीय करिअरची सुरुवात काँग्रेसमधून झाली. तर, १९९९ मध्ये त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. राजकारणात आल्यानंतर त्यांनी एकही सुट्टी घेतली नाही, तुम्ही लोकांनी मला आमदार केल, मंत्री केलं. चारवेळा मुख्यमंत्री केलं. मात्र तुम्ही लोकांनी मला ५६ वर्ष एकही सुट्टी दिली नाही. शेतकरी देखील आपल्या बैलाला सुट्टी देतो मात्र आपण मला सुट्टी देत नाहीत. हे वागणं काही बरं आहे का? इतकी वर्षे लोकांनी साथ दिली, त्यामुळे माझी नैतिक जबाबदारी आहे की शेवटपर्यंत विकासाची कामे करत राहायची. गावात, जिल्ह्यात आणि दिल्लीत तुम्हा लोकांना पुढे ठेवूनच काम करायंच, हे सूत्र ठेवून काम करतोय. तुम्हा सर्वांची साथ आहे याबाबत कृतज्ञता व्यक्त करतो.**



**– शरद पवार**
संस्थापक, राष्ट्रवादी काँग्रेस

# माळशिरसचं राजकारण उलथापालथीच्या वळणावर



**पिलीव : लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने लक्ष्यवेधी ठरलेल्या माळशिरस तालुक्याचं राजकारण उलथापालथीच्या नाट्यमय वळणावर असून लोकसभा निवडणुकीच्या उमेदवारीचं चित्र नेमकं कधी स्पष्ट होणार याकडे अवघ्या तालुक्याचे लक्ष लागले आहे.**

संपूर्ण माढा लोकसभा मतदारसंघात सध्या मोहिते-पाटलांची जोरदार मोर्चे बांधणी सुरुच आहे. माढा लोकसभा मतदारसंघातील सर्व तालुक्यातील त्यांचा थेट मतदारांशी संपर्क सुरु आहे. तथापि, त्यांच्या राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटातील प्रवेशाची प्रतिक्षा तालुक्याला आहे. सर्वत्र त्यांचाच उमेदवारीचा विषय चर्चेत आहे. मोहिते-पाटील आणि भाजप श्रेष्ठींची सध्या बोलणी थांबली असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे नेते उत्तम जानकर यांनीही भाजप पासून चार हात लांब राहणेच पसंत केले असून तालुक्यातील प्रत्येक गावाचा दौरा करुन ते कार्यकर्त्यांच्या भावना जाणून घेत आहेत.

दरम्यान, जानकर हेदेखील काय निर्णय घेतात याबद्दल त्यांच्या समर्थकांना मोठी उत्सुकता लागून राहिली आहे. त्यांचे शिष्टमंडळ मुंबईत जाऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून आले आहे. त्यानंतर उत्तम जानकर यांनी गाव दौरे वाढविले आहेत. त्यांची भूमिका अद्यापही गुलदस्त्यातच आहे. तर दुसरीकडे विद्यमान खासदार व सध्याचे महायुतीचे उमेदवार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी माळशिरस येथे नुकतीच जिल्हा परिषद गटवाईज बैठका घेऊन तालुक्यातील मोहिते -पाटील व जानकर हे दोन्ही गट बरोबर असले तर काय होईल किंवा जानकर गट बरोबर असेल तर मतदानाबाबत काय होईल? याचा सविस्तर आढावा घेतला आहे. त्यामुळे तेही चांगलेच तयारीला लागले आहेत. माळशिरस तालुक्यात सध्या आमदार राम सातपुते यांची चांगलीच उणीव जाणवत असल्याचे कार्यकर्ते बोलून दाखवत आहेत.आमदारांना सोलापुरला पक्षाने उमेदवारी दिली नसती तर तालुक्यात त्यांनी जोरदार नियोजन लावले असते, त्यामुळे चांगले मतदान भाजपला मिळाले असते असे कार्यकर्ते बोलत आहेत. पण काही असेना गत निवडणुकीत माळशिरस तालुक्यातून भाजपला एक लाख सहा हजार मतांचे मताधिक्य मिळाले होते. या खेपेस काय होणार याची उत्सुकता आहे. कारण मोहिते-पाटील यांचा विद्यमान खासदारांना विरोध आहे. तर उत्तम जानकरांची भूमिका गुलदस्त्यात आहे.



# माढ्याच्या साम्राज्यात पवार अन् फडणवीसांचाच कस



**विजय राऊत**
**माढा**

महायुतीकडून विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांची उमेदवारी निश्चित झाल्याने त्यांनी वेगवेगळ्या कार्यकर्त्यांच्या बैठका घेत वातावरण निर्मितीस प्रचाराचा प्रारंभाआधीच सुरुवात केली. बाळासाहेब आंबेडकरांच्या वंचित आघाडीने मोहोळचे माजी नगराध्यक्ष रमेश बारसकरांची उमेदवारी जाहीर केली असून त्यांनी मतदारसंघाचा दौरा करत प्रचाराला सुरुवात केली. त्यामुळे या निवडणुकीमध्ये निंबाळकर आणि मोहिते-पाटील यांच्यापैकी कोणाला वंचितचे बारसकर विजयापासून वंचित ठेवून वंचित आघाडीचा चत्मकार दाखवितात पाहणे मोठे औत्सुक्याचे ठरणार आहे.

मोहिते-पाटलांनीही जिल्ह्यातील आपले राजकीय बस्तान पुन्हा बसवण्यासह आपली राजकीय घडी विस्कटू नये, या उद्देशाने लोकसभेची निवडणूक लढवण्याचे पक्के केले आहे. मोहिते-पाटील कदाचित येणाऱ्या निवडणुकीत आपल्या सोबत राहणार नाहीत याची कल्पनाच जणू भाजपला पर्यायाने फडणवीस यांना होती. त्यांनीच मोहिते-पाटील परिवाराचे कट्टर विरोधक माढ्याच्या शिंदे बंधूंना जवळ घेत बेरजेचे राजकारण केल्याचे पाहायला मिळाले.

**माढा लोकसभा मतदारसंघात खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर अन् धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यात सामना होत असल्याचे दिसत असले तरी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी हा मतदारसंघ कमालीच्या प्रतिष्ठेचा बनवला आहे. त्यामुळे ही लढत खऱ्या अर्थाने निंबाळकर विरुद्ध मोहिते-पाटील अशी न राहता फडणवीस व पवार अशी होणार आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप आणि सेना या सर्वांनी भाजप उमेदवार निवडून आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आदेश दिले.

मात्र, भाजप सरकारने गेल्या काही दिवसांपासून उध्दव ठाकरेंची शिवसेना असेल शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस असेल किंवा काँग्रेस पक्षातील इतर नेते असतील यांना आपल्या पक्षात घेत इतर पक्षांना फोडण्याचे काम केले आणि विशेषत: यामध्ये ज्यांच्या वरती भ्रष्टाचाराचे आरोप केले गेले त्या भ्रष्टाचारी नेत्यांना आपल्या पक्षात घेत सन्मान दिला याचा कुठेतरी सर्वसामान्य मतदारातून संताप व्यक्त होताना दिसतो. ही नाराजी भाजप आणि निंबाळकर कशी दूर करतात याच्यावरच उद्याचा निर्णय अवलंबून आहे

मात्र सोलापूर लोकसभेत गतवर्षी वंचित बहुजन आघाडीने सुशीलकुमार शिंदेना अडचणीत आणले. तसे चालू निवडणुकीत वंचित आघाडी कोणाला अडचणीत आणत विजयापासून वंचित ठेवणार हे पाहावे लागणार आहे.

वंचित कडून रमेश बारसकर यांनी गावभेट दौरा सुरू केला असून माढ्यातील ओबीसी एल्गार मेळावा घेत आणि या मेळाव्यास ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांना आणून आपणही उमेदवारीचे दावेदार असल्याचे याअगोदरच जाहीर केले होते.

## ॲड. हाकेंची गाव दौरे

माढा मतदार संघातील धनगर समाजाची निर्णायक मते असून त्या खालोखाल मराठा, ओबीसी व एससी समाजाचे प्राबल्य असल्याचे दिसून येते. याच पार्श्वभूमीवर, उद्धव ठाकरे गटाचे पदाधिकारी तथा राज्य मागासवर्गीय आयोगाचे माजी सदस्य ॲड. लक्ष्मण हाके हे ही इच्छुक असून तेही गावोगावी जात आपल्याला कसा प्रतिसाद मिळेल याची चाचपणी करीत आहेत. ओबीसी नेते प्रकाश अण्णा शेंडगे यांच्या नव्या पक्षाकडून तेही या मतदार संघात उभा राहण्याची तयारी करीत आहेत.

## पवारांकडून अनेकांना धोबीपछाड देण्याची तयारी

महाविकास आघाडीच्या वतीने धैर्यशील मोहिते-पाटील उभा राहिल्याने 'काँटे की टक्कर' पाहायला मिळणार आहे. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या बद्दल असणारी आपुलकी त्यांचा संपर्क आणि सत्तेच्या काळात केलेली विकासकामे यावेळी कामी येणार आहेत. यातच शरद पवार यांनी हा मतदारसंघ बारामतीनंतर अतिशय प्रतिष्ठेचा केला असून मोहिते-पाटलांच्या आडून ते अनेकांना धोबीपछाड देण्याच्या तयारीत असल्याचे बोलले जात आहे.

# धाराशीवचा तिढा मुख्यमंत्र्यांच्या आंगणी

**सुहास मस्के**
**परांडा**

धाराशिव लोकसभेच्या मतदारसंघावरून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, भारतीय जनता पक्षातील तिढा सुटण्याचे नाव घेईना झालाय. आरोग्यमंत्री प्रा. तानाजी सावंत यांचे पुतणे धनंजय सावंत आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह मुंबईला रवाना झाले. ज्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या गुंडगिरीला संपवण्यासाठी ४० वर्ष शिवसैनिकांनी संघर्ष केला त्यांनाच मतं द्या म्हणून आम्ही कसे समोर जायचे? असा सवाल त्यांच्यासह समर्थकांनी थेट मुख्यमंत्र्यांना केला.

मुख्यमंत्री शिंदे हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेसाठी चंद्रपुरात होते. ते रात्री मुंबईला परतले. त्यावेळी सावंत समर्थकांनी भेट घेऊन आपल्या संतप्त भावना त्यांच्या कानावर घातल्या. धाराशीवची जागा जिंकण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांनी संघर्ष केला आहे. त्याला काही वेळा हिंसाचाराचा सामना करावा लागला. तेंव्हा असे निर्माण झालेले हाडवैर विसरून प्रचार करा असे आम्ही शिवसैनिकांना कोणत्या तोंडाने सांगू? असा सवाल धनंजय सावंत यांनी माध्यमांशी बोलताना केला. त्यांच्या या वक्तव्याची क्लीप सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. त्यामुळे अर्चना पाटील यांच्या अडचणीत वाढ होत असल्याचे चित्र आहे.

धनंजय सावंत यांच्या सोबत सुमारे हजारभर कार्यकर्ते आणि शाखाप्रमुख ते जिल्हाप्रमुख असा संच त्यांच्यासह रवाना होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले तरी आम्ही अर्चना पाटील यांचा प्रचार करणार नाही. त्यामुळे ही जागा शिवसेनेने आपल्याकडे घ्यावी आम्ही धनुष्यबाणाचे चिन्ह असलेल्या उमेदवाराला मोठ्या फरकाने विजयी करू, या निर्धारावर हे शिवसैनिक ठाम आहेत.



## मुख्यमंत्रीच पेचात

राष्ट्रवादीकडून अर्चना पाटील यांना मैदानात उतरवण्याची कल्पना भाजपा नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आहे. त्यामुळे मुख्यमंत्री हतबल असल्याचे चित्र आहे. साताऱ्याची राष्ट्रवादीची जागा भाजपला देण्याची गरज निर्माण झाल्याने धाराशीवची जागा राष्ट्रवादीला देवून तेथून त्यांचा खासदार निवडून आणू, असा शब्द फडणवीस यांनी दिला. त्यामुळे मुख्यमंत्री शिंदे या कल्पनेला विरोध करणार नाहीत अशी अटकळ अजित पवार गटाची आहे. प्रत्यक्षात मात्र शिवसैनिक मैदानात उतरून विरोधात उतरण्याच्या मानसिकतेत असल्याने मुख्यमंत्री पेचात सापडले आहे.